जीवनातली छोटीशी खुशी ही मोठ्या सुखाचा आधार असते

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ११ जून २०२५ | अंक १७७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

All TOURS घर से घर तक
SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
दिल से दिल तक
I'TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555



# जरांगे पाटलांचा बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा

## बच्चू कडू यांची घेणार भेट

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडू यांचं गेल्या तीन दिवसांपासून गुरुकुंज मोझरीमध्ये बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. याच आंदोलनस्थळी उद्या (11 जून) दुपारी 4 वाजता मनोज जरांगे बच्चू कडू यांच्या आंदोलनस्थळी जाऊन बच्चू कडू यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे आता या दोन्ही नेत्यांच्या भेटीकडे सगळ्यांकडे लक्ष लागले आहे.

माजी मंत्री तथा प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांच्याकडून सध्या बेमुदत अन्नत्याग आंदोलन केले जात आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला यांच्या वेगवेगळ्या मागण्यांना घेऊन ते सध्या हे आंदोलन करत आहेत. काहीही झालं तरी मी अन्नाचा एकही कण घेणार नाही, असं बच्चू कडू यांनी याआधीच जाहीर केलं आहे. दरम्यान, आता कडू यांच्या या आंदोलनाला दिवसेंदिवस पाठिंबा वाढत आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनीही कडू यांना थेट पाठिंबा दिला आहे. विशेष म्हणजे मनोज जरांगे हे बच्चू कडू यांची उपोषणस्थळी जाऊन भेट घेणार आहेत. मनोज जरांगे बच्चू कडू यांना पाठिंबा बच्चू कडू यांचे अमरावतीच्या गुरुकुंज मोझरीमधील तुकडोजी महाराजांच्या समाधी परिसरात हे अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. त्यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, अशी मागणी केली आहे. त्यांच्या याच मागणीला मनोज जरांगे यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. मनोज जरांगे हे बच्चू कडू यांची भेट घेणार आहेत. मनोज जरांगे पाटलांचा बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

# लग्नाचे आमिष दाखवत तरुणीवर वारंवार अत्याचार

## आरोपीविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

माजलगाव : लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अनेकदा अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. यातून पीडिता गर्भवती राहिली. माजलगाव शहरात ही घटना मे महिन्यात उघडकीस आली. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३०) याच्यासोबत मैत्री झाली. त्याचे रूपांतर प्रेमात झाले.



त्यानंतर, पीडितेला विश्वासात घेऊन आरोपीने तिच्यावर अत्याचार केला. तू मला आवडतेस, मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे, असे आमिष त्याने तिला दाखवले. लग्नाचे आमिष दाखवून तिला घरी नेऊन अत्याचार केला. मागील महिन्यात पीडितेचे पोट दुखायला लागले. त्यानंतर, आई वडिलांनी तिला अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात नेले. तेथे तपासणी केली असता, पीडिता ही साड ेपाच महिन्यांची गर्भवती असल्याचे उघड झाले. घडलेला प्रकार समोर आल्यानंतर पीडितेन कुटुंबीयांच्या मदतीने ८ जून रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात सुनील अलझेंड े विरोधात अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक भोसले हे करत आहेत.

# खा.सोनवणेंनी लक्ष घातले अन् चिंचोलीमाळी सबस्टेशनला मिळाले रोहित्र

केज। प्रतिनिधी चिंचोली माळी येथील सबस्टेशन येथे ५ एमव्हीए क्षमतेचे ट्रान्सफार्मर बसविण्याची मागणी शेतकऱ्यांकडून आल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरण विभागाचे मुख्यअंभियता लातूर यांना पत्र लिहले होते. यानंतर दि.९ रोजी याठिकाणी रोहित्र मिळाले असून याबाबत ग्रामस्थांनी आभार मानले आहेत. चिंचोली माळी येथे महावितरणचे सबस्टेशन आहे. मात्र, कमी क्षमतेच रोहित्र याठिकाणी असल्याने अनेकदा अडचणीचे ठरत होते. सदरील ठिकाणी ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मिळवून देण्यात यावे, अशी ग्रामस्थ आणि परिसरातील शेतकऱ्यांची मागणी होती. दरम्यान, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी महावितरणचे मुख्य



अभियंता यांना पत्र देऊन सदरील काम मार्गी लावावे, असे म्हटले होते. यानंतर ५ एमव्हीए अतिरिक्त पॉवर रोहित्रचे काम करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या देण्यात यावा, अशा सुचनाही देण्यात आल्या होत्या. सदरील कामाची प्रशासकिय मान्यता आल्यानंतर परवानग्यांचा विषय समोर आला होता. यातही खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला. यानंतर दि.९ जून रोजी रोहित्र बसविण्यात आले. आता रोहित्र बसविल्याने उच्च दाबाने विद्यूत पुरवठा होणार आहे. शिवाय शेतकऱ्यांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. दरम्यान, खा.सोनवणे यांनी शेतकऱ्यांच्या विषयात लक्ष घालून बारकाईने पाठपुरावा केल्याबद्दल शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत.

# रस्त्यावर उभ्या असलेल्या बर्निंग बस मुळे मोटारसायकलचा अपघात

केज : दि. ९ जून रोजी दुपारी ३.३० वा. च्या सुमारास कळंब आगाराची केज कळंब (एम एच ११/ बी एल-९३७५) ही कळंब गाराची एसटी बस केज कडून कळंबकडे जात असतानाच पेटली. त्यामुळे ती रस्त्यावरच जवळ जळालेल्या अवस्थेत अंधारात रस्त्यावर उभ्या होती. ही बस अचानक न दिसल्यामुळे रात्री ८:०० वाजण्याच्या सुमारास एक मोटरसायकलस्वार अचानक ताबा सुटून रस्त्यावर पडला. या मोटार सायकल क्र. (एम एच- या ४४) ए बी- ६२३४) वरून जात असलेले गणेश कल्याण हाके आणि अशोक



बबन हाके हे दोघे प्रवास करीत होते. ते दोघे रस्त्यावर मोटरसायकलसह पडले त्याच वेळी कळंब कडून केजकडे जात असलेल्या एका अवजड ट्रक क्र. (एम एच १० /एस- ७९१६) ने मोटार सायकलला सुमारे १०० ते १५० फूट फरफट नेले. या अपघातात गणेश कल्याण हाके आणि अशोक बबन हाके हे दोघे गंभीर जखमी झाले.

# जयंत पाटील यांचे प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याचे संकेत!




पुणे : पक्षाच्या (राष्ट्रवादी) २६ व्या स्थापना दिनानिमित्त झालेल्या एका महत्त्वपूर्ण कार्यक्रमात, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या नेतृत्वाच्या भूमिकेतून पायउतार होण्याचे संकेत दिले. आज मंगळवारी रोजी पुण्यातील बालगंधर्व रंग मंदिरात आयोजित एका उत्सवी कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली. त्यांच्या या घोषणेमुळे शरद पवार भारकीर फिरवणार का? त्यासोबतच पक्षात खांदेपालट होणार का? पक्षनेतृत्वाच्या मनात नेमके चाललंय तरी काय? अशा एक ना अनेक चर्चांना उधान आले आहे. जयंत पाटील नेमके म्हणाले तरी काय? पक्ष कार्यकर्ते आणि नेत्यांना संबोधित करताना जयंत पाटील यांनी त्यांच्या दीर्घ कारकिर्दीची मांडणी करताना नवीन नेतृत्वाची गरज उघडपणे मान्य केली. पवार साहेबांनी मला खूप संधी दिल्या. मला सात वर्षे देण्यात आली.

# अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्याची श्रमिक महासंघाची मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्यातील श्रमिक महासंघाच्या वतीने भारताचे महामहिम राष्ट्र पती यांना निवेदन पाठवून समाजसुधारक, लोककवी, साहित्यिक आणि श्रमिक नेते पूज्य अण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी करण्यात आली आहे. श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण मरीबा वाघमारे यांनी हे निवेदन पाठवले असून, अण्णा भाऊ साठे यांच्या लोकहितकारी कार्याचा राष्ट्रीय स्तरावर सन्मान व्हावा, या हेतूने हा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखन, लोककला आणि आंदोलनात्मक कार्याच्या माध्यमातून समाजातील वंचित, श्रमिक व शोषित घटकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. मफकिराफ, ममाझं जीवनगाणंफ यांसारख्या त्यांच्या साहित्यकृती आजही समाजिक जाणीवेचे प्रकाशस्तंभ आहेत. ते पुढे म्हणाले की, तमाशा, पोवाडा, भारूड या लोककला प्रकारांद्वारे त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. अण्णा भाऊंचा योगदान केवळ साहित्यिकच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रनिर्माणाच्या दृष्टीनेही अत्यंत मौल्यवान आहे. निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, जर शासनाने १ ऑगस्ट २०२५ पर्यंत ही मागणी मान्य केली नाही, तर श्रमिक महासंघाच्या वतीने नवी दिल्लीतील जंतर-मंतरवर शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल. हे आंदोलन पूर्णतः अहिंसात्मक व संविधानिक चौकटीत राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या निवेदनाद्वारे अण्णा भाऊ साठे यांचे कार्य राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळावी

# वामा लढाई सन्मानाची चित्रपटास पत्रकारांचा उत्तम प्रतिसाद



बीड-प्रतिनिधी तेलुगु हिंदी, अवधी, भोजपुरी अशा इतर चार भाषांमधील नऊ हिट चित्रपटांनंतर आपल्या भूमिपुत्राच्या मराठी सिनेसृष्टीतील उपहिलाच मराठी चित्रपट ङ्गवामा लढाई सन्मानाचीफ संपूर्ण महाराष्ट्रात मागील ३ आठवड्यांपासून हाऊसफुल सुरू आहे. बीडकरांनी देखील आपल्या भूमिपुत्राच्या चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद दिला आहे. दिनांक ८ जून २०२५ रोजी बीड मधील समस्त पत्रकार बांधवांसाठी वामा लढाई सन्मानाची स्पेशल शो चे आयोजन करण्यात आले होते. या चित्रपटास पत्रकारांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. जगात पदोपदी आढळणारा पुरुषी अहंकार व स्त्रिला त्यामुळे होणारा त्रास हा परंपरा म्हणून सर्वांनी स्विकारला आहे. आधुनिक म्हणवणाऱ्या काळातही तेच चालु आहे. पण स्त्रि-सशक्तीकरण झाल्यामुळे यात काय फरक पडु शकतो हे या चित्रपटात सरला या नायिकेची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री कश्मीरा कुलकर्णी यांनी या भूमिकेत स्वतःला अक्षरशा झोकून देत ती सादर केली आहे. पडद्यावर ही भूमिका साकारताना त्या जेवढ्या साध्या सरळ आणि सोज्वळ वाटल्या तेवढ्याच कणखर प्रसंगात अत्यंत आक्रमक आणि जोशाने भरपूर दिसल्या .त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव, संवादाची सादरीकरण,

# विवाहितेचा विहिरीत आढळला मृतदेह

## सासरच्यांनी मारून विहीरीत टाकल्याचा नातेवाईकांचा आरोप

गेवराई। प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील एरंडगाव येथे एका विवाहितेचा मृतदेह विहिरीत आढळून आला. वटसावीत्री पौर्णिमेच्या पुर्वसंध्येला आमच्या मुलीला सासरच्या लोकांनी मारून टाकले, असा आरोप माहेरच्यांनी केला आहे. जोपर्यंत दोषींवर गुन्हे दाखल होत नाहीत, त्यांना अटक केली जात नाही, तोपर्यंत मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात येणार नाही, अशी भूमिका माहेरच्या लोकांनी घेतली आहे. सविस्तर माहिती अशी कि, गेवराई तालुक्यातील एरंडगाव येथील वर्षा ओमप्रकाश लाटे ही महिला काल (दि.९) सोमवार रोजी सकाळी दहा वाजल्यापासून बेपत्ता होती सकाळी ती शेतामध्ये अन्य एका महिलेसोबत काम करण्यासाठी आली मात्र त्या महिलेला मी घरी जात आहे. असे सांगून वर्षा शेतातून निघून गेली दुपारनंतर वर्षा शेतात आणि घरी नसल्याने तिचा शोध सुरू करण्यात आला मात्र ती मिळून येत नव्हती. सायंकाळी चार ते पाच वाजल्याच्या दरम्यान लाटे यांच्या शेतातील विहिरीजवळ वर्षा हिचा स्कार्फ दिसून आला त्यामुळे ती विहिरीत असावी म्हणून विहिरीत शोध घेण्यास सुरुवात केली. तेव्हा तिचा मृतदेह विहिरीत असल्याचे काहींच्या लक्षात आले तोपर्यंत तिचे माहेर असलेल्या ईटकुर येथल नातेवाईक घटनास्थळावर आले जोपर्यंत पोलिस घटनास्थळी येत नाहीत तोपर्यंत मृतदेह काढला जाणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली शेवटी गेवराई पोलीस त्या ठिकाणी डेरे दाखल झाले पोलिसांच्या उपस्थितीत रात्री वर्षाचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास वर्षाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी बीड(इशशव) जिल्हा रुग्णालयामध्ये पाठवण्यात आला. आज मंगळवार (दि.१०) रोजी सकाळी नातेवाईकांनी मृतदेह पाहिला तेव्हा तिच्या गळ्यावर, अंगावर अणि अन्य ठिकाणी मारहाणीच्या खुणा होत्या. सासरच्या लोकांनी आमच्या मुलीला मारून विहिरीत फेकले, असा आरोप करत नातेवाईकांनी जोपर्यंत मारेकर्यांवर गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक केली जात नाही तोपर्यंत शवविच्छेदन करणार नाही, अशी भूमिका घेतली. नातेवाईकांनी जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयात जावून पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांचीही भेट घेतली. या वेळी कॉंवत यांनी ङ्गदोषींवर कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
**लोकआरंभ**
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ११ जून २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### जगातील सर्वांत उंच रेल्वे पुल खुला

जगातील सर्वांत उंच अशा चिनाब रेल्वेपुलाचे शुक्रवारी उद्घाटन झाल्यानंतर काश्मीर खोरे उर्वरित भारताशी रेल्वेने जोडण्याचा महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. विशेषत: दक्षिण टोकावरील रामेश्वरम येथील पांबन पूल सुरू झाल्यानंतर दोन महिन्यांतच उत्तर सीमेवरील चिनाब रेल्वेपूल खुला होण्याने आता देशातील रेल्वेचे ङ्गआसेतुहिमाचलफ सेवेचे स्वप्न खऱ्या अर्थाने पूर्ण झाले, असे म्हणता येईल. कटरा ते श्रीनगर या मार्गावर पहिली रेल्वेगाडीही धावली. त्यामागे गेल्या काही दशकांतील अथक संघर्ष आणि कष्टांची पार्श्वभूमी आहे. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जम्मू-काश्मीरमध्ये रेल्वेसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला; मात्र फुटीरतावाद्यांच्या कारवायांसह अनेक अडचणींमुळे त्याला गती मिळाली नाही. दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी २००२मध्ये याला राष्ट्रीय प्रकल्पाचा दर्जा दिला आणि सन २००५मध्ये त्याचे प्रत्यक्ष काम सुरू झाले. भौगोलिक परिस्थिती, प्रतिकूल हवामान, बर्फवृष्टी, भूस्खलन, दहशतवादी कारवाया, यांसोबतच पर्यावरणविषयक नियमांचे अडसर आणि न्यायालयीन अडथळे पार करीत देशातील तंत्रज्ञांनी हे आव्हान पूर्ण केले. प्रारंभी खेचरांच्या पाठीवर साहित्य वाहून कामास सुरुवात झाली आणि हजारो तंत्रज्ञ कामगारांच्या कष्टांमधून हिमालयाच्या कुशीत डझनावारी लहानमोठे बोगदे- पूल आणि सर्वांत उंच चिनाब पूल असे तंत्रज्ञानाचे चमत्कार असलेला उधमपूर-बारामुल्ला प्रकल्प साकारला आहे. या रेल्वे प्रकल्पाच्या पूर्तीमुळे काश्मीर खोरे जम्मू आणि उर्वरित भारतासाठी बारमाही रेल्वेने जोडले गेले आहे. त्यामुळे काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पर्यटनास मोठे बळ प्राप्त होईल. सध्याच्या जम्मू-श्रीनगर महामार्गावर वाहतुकीचा अतिरिक्त ताण आहे; तसेच वारंवार दरडी कोसळण्यासारख्या अडचणींमुळे तेथील वाहतूक अनेकदा बंद पडते. आता रेल्वेने ही वाहतूक सुलभ होईल. कामगार-व्यापारी आणि विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ मिळेल. जम्मू-काश्मीरमधून सफरचंद, अक्रोड, बदाम असा सुमारे दहा हजार कोटी रुपयांचा शेतीमाल बाहेर पाठविला जातो; रेल्वेमार्ग सुरू झाल्यावर त्यामध्ये चौपटीने वाढ होण्याचा अंदाज आहे. त्यासह तेथील हस्तकलेच्या वस्तू सारख्या इतर उत्पादनांसाठीही देशाची बाजारपेठ खुली होईल. घटनेतील ३७०वे कलम वगळल्यानंतर भविष्यात होणारी गुंतवणूक आणि उद्योगांना कच्चा माल व बाजारपेठेसाठीही ही पायाभूत सुविधा उपयुक्त ठरेल, यात शंका नाही. नेहमीच तणावाचा सामना करणाऱ्या या राज्यात नव्याने सुरू झालेल्या या रेल्वेसेवेचे सुरक्षेच्या अंगानेही महत्त्व आहे. सुरक्षेच्या दृष्टीने मनुष्यबळ आणि रसद वेगाने पुरविण्यास या रेल्वेमार्गाचा मोठा हातभार लागणार आहे. विशेषत: बर्फवृष्टीच्या काळातही लष्करी हालचालींसाठी हा मार्ग उपयुक्त आहे. अर्थात, या रेल्वेमार्गाच्या सुरक्षेचीही विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. हा प्रकल्प म्हणजे एका अर्थाने पंतप्रधान मोदी यांच्या याच कार्यक्रमातील, ङ्गकितीही हल्ले झाले, तरी विकास थांबणार नाही,फ या भाषणातील उक्तीला दिलेली कृतीची जोड आहे. गेल्या काही काळात काश्मीरमध्ये सुरक्षा दलांचा कडेकोट बंदोबस्त आहे. तेथे पूर्वीच्या तुलनेत शांतता अनुभवास येत होती आणि विधानसभेच्या निवडणुकीनंतर तेथे लोकनियुक्त सरकारनेही कारभारास सुरुवात केली होती. पर्यटकांच्या संख्येतही वाढ होत होती. काश्मीरमधील हीच सुरळीत परिस्थिती डोळ्यांत खुपत असल्याने पाकिस्तानने पहलगाम येथे दहशतवादी हल्ला घडवून आणला. त्यामुळे काश्मीरच्या अर्थकारणाला धक्का बसला आहे. या हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारताने ङ्गऑपरेशन सिंदूरफद्वारे पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर हल्ले करून पाकिस्तानला चोख उत्तर दिले. या मोहिमेनंतर महिन्याभरातच काश्मीरमध्ये या महत्त्वाकांक्षी विकासप्रकल्पाचे उद्घाटन होण्यामागे वेगळे औचित्य आहे. दहशतवाद्यांचा स्थानिकांमधील पाठिंबा तोडणे, हे कोणत्याही देशाच्या दहशतवादाविरोधातील लढाईचे मोठे साध्य मानले जाते. पर्यटकांवरील हल्ल्यामुळे काश्मीरमधील हजारोंच्या रोजीरोटीवर गदा आणण्याने तेथील जनता दहशतवादाच्या विरोधात रस्त्यावर उतरली आहे. या जनतेला शिक्षण-रोजगार आणि विकासाची आस आहे. सर्वसामान्यांची प्रगती, हाच काश्मीरला शांततेकडे नेण्याचा मार्ग आहे. नव्याने सुरू झालेली रेल्वेसेवा हे त्याच मार्गावरचे महत्त्वाचे स्थानक ठरणार आहे

# बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाच्या २६ वर्धापन दिन सोहळा संपन्न

## मा.शरदचंद्र पवारांनी सहकाऱ्यांना व उपस्थितांना शुभेच्छा देऊन केलं संबोधित

विशेष प्रतिनिधी : बालाजी सिरसाट पुणे : प्रांताध्यक्ष जयंतराव पाटील, अतिशय थोड्या दिवसांमध्ये हा आजचा सोहळा आयोजित करण्यासाठी ज्यांनी कष्ट केले ते पक्षाचे पुणे अध्यक्ष प्रशांत जगताप, त्यांचे सर्व सहकारी आणि राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या माझ्या सहकारी मित्रांनो.. आजचा हा दिवस म्हणजे पक्षाचा '२६ वा वर्धापन दिन'. २६ वर्षांपूर्वी आपण एकत्र आलो आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा'ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. जनतेचा पाठिंबा मिळाला आणि बोलत बोलत पक्षाला उभारी आली. महाराष्ट्राच्या जनतेचं आपण ऋण व्यक्त करावं की, फार थोड्या दिवसांमध्ये महाराष्ट्राचा कारभार करण्यासाठी राष्ट्रवादीच्या सहकाऱ्यांना सामान्य जनतेने संधी दिली. कुणी उपमुख्यमंत्री झालं, कुणी मंत्री झालं, कुणी जिह्ला परिषद, कुणी महानगरपालिका, कुणी नगरपालिका, विविध महत्त्वाची सत्तेची स्थानं सर्वसामान्य जनतेने आपल्या कार्यकर्त्यांच्या पाठी दिली आणि लोकांची सेवा करण्याची संधी दिली. तुमचं एक वैशिष्ट्य होतं की, तुमच्यामधले अनेक सहकारी कधी सत्तेवर नव्हते. पण त्यांना संधी मिळाली आणि त्याने एक संदेश गेला की, प्रशासन चालवायला सामान्य कुटुंबातल्या प्रामाणिक कार्यकर्त्याला संधी मिळाल्यानंतर तोही कर्तृत्व दाखवू शकतो आणि राज्य चालवू शकतो. ती जर मालिका बघितली तर अनेकांची नावं सांगता येतील. प्रांताध्यक्ष आहेत अर्थमंत्री म्हणून त्यांनी १० वर्ष काम केलं. अनिलबाबू आहेत, जितेंद्र आव्हाड आहेत, फौज़ियाताई आहेत, अनेकांची नावं या ठिकाणी घेता येतील. पण मला आठवण होते तुमच्यातल्या सामान्य कार्यकर्ता म्हणून ज्यांनी कष्ट केले आणि दुर्दैवाने ते आज हयात नाहीत त्या आर. आर. आबांच्याबद्दल. आर. आर. पाटील सामान्य कुटुंबातले होते. मला आठवतंय की, सांगली जिल्ह्यामध्ये एके दिवशी मी होतो, तरुणांची बैठक होती. त्यात एक दोन लोक फार चांगलं बोलले. मी चौकशी केली की, हा कोण आहे मुलगा? मला सांगण्यात आलं त्यांचं नाव आर. आर. पाटील. मी बोलावून घेतलं त्यांच्याशी सुसंवाद केला, माझ्या लक्षात आलं की यांच्यात कर्तुत्व आहे. लगेचच जिह्ला परिषदेच्या निवडणुका होत्या, त्यांना उभं करण्याचा निर्णय झाला. नंतर विधानसभेची संधी मिळाली, तिथेही प्रभावी आमदार म्हणून त्यांनी काम केलं. दुसऱ्या निवडणुकीमध्ये सत्ता आली, ग्रामविकास खात्याचं काम त्यांच्याकडे आलं. नंतर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून त्यांनी काम केलं. त्यांचे अनेक निर्णय महाराष्ट्राच्या जनतेला भावले. त्यातून एक संदेश गेला की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामान्य कुटुंबातील तरुणांना घेऊनसुद्धा त्याला संधी देतं. त्यांच्यामार्फत महाराष्ट्राचा चेहरा बदलण्यासाठी कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांचा हा पक्ष आहे. त्यामुळे, तुम्हा सगळ्यांच्या कष्टामुळे, बांधिलकीमुळे आणि वैचारिक स्पष्टतेमुळे ही पक्षाची प्रतिष्ठा वाढली. म्हणून आजचा हा २६ वा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी आपल्याला संधी मिळते आहे. केंद्र सरकारमध्ये काम करता आलं. मोजके खासदार असताना सुद्धा मी असेन, सूर्यकांता पाटील असतील, अनेकांची नावं घेता येतील. केंद्र सरकारमध्ये या पक्षाला काम करण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर विरोधी पक्षामध्ये बसण्याची संधी आली, तर तिथेही प्रभावीपणाने आपण काम करू शकतो हे त्या ठिकाणी दिसलं. समाधान एका गोष्टीचा आहे की, या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संधी मिळाल्यानंतर अनेक निर्णय असे घेतले की त्या निर्णयाचा परिणाम राज्यावर सुद्धा झाला. मगाशी कोणीतरी महिला सक्षमीकरणाबद्दल बोललं. पण पहलगामच्यानंतर हा जो प्रसंग देशावर आला आणि त्यानंतर जी कारवाई करण्याची वेळ आली त्या कारवाईचे स्वरूप हे जनतेला सांगण्याचे काम दोन भगिनींनी केलं. त्या दोन्ही भगिनी देशाच्या आर्मी, नेव्ही, एअर फोर्स इथं काम करणाऱ्या होत्या. देशाला अभिमान वाटला की, सैन्यामध्ये मुलींना संधी मिळाल्यानंतर जनतेमध्ये एक विश्वास निर्माण करण्याचं काम भगिनीसुद्धा करतात. आज जिह्ला परिषदेच्या निवडणुका, नगरपालिकांच्या निवडणुका, महानगरपालिकांच्या निवडणुका दोन- तीन महिन्यांवर आलेल्या आहेत. इथे ५० टक्के भगिनींना निवडून द्यायचंय. कर्तृत्वाचा मक्ता हा फक्त पुरुषाकडे असतो यावर माझा विश्वास नाही. भगिनींना संधी मिळाली तर त्याही कर्तृत्व दाखवू शकतात, संधी दिली पाहिजे. ते आपण अनुभवलं. उद्याच्या निवडणुकीमध्ये ५० टक्के जागा भगिनींना द्यायच्या, तो धोरणात्मक निर्णय आपण घेतला. तो यशस्वी करण्याचं काम येत्या दोन- तीन महिन्यांमध्ये आपल्याला करायचंय. सत्ता हातात असल्यानंतर अनेक गोष्टींमध्ये आपण लक्ष घातलं. शेती असेल, उद्योगधंद्याचा विकास असेल, शैक्षणिक सेवेचा विस्तार असेल, सामाजिक संस्थांचा कार्यक्रम राबवायचा असेल या प्रत्येक गोष्टींमध्ये 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा'च्या कार्यकर्त्यांनी जिथे जिथे संधी मिळाली, त्यावेळेला अधिकारांचा वापर करून त्याची पूर्तता करण्याचा प्रयत्न केला. तुम्हा सगळ्यांनी पक्षामध्ये काही संकट आली तरी नाउमेद न होता हा पक्ष पुढे नेण्याचं काम तुम्ही लोकांनी केलं. पक्षामध्ये फूट पडली. फूट पडावी असं कधी आपल्याला वाटत नव्हतं, पण पडली. काही मूलभूत विचारांसंबंधी अंतर झालं आणि त्यामुळे ही फूट वाढली. मी काही त्याच्यासंबंधी अधिक भाष्य करू इच्छित नाही. पण जे राहिले ते विचाराने राहिले. जे राहिले ते विचार घेऊन पुढे जनतेला, त्यांच्या सुखदु:खाला साथ देण्यासाठी राहिले. मला १००% विश्वास आहे की, उद्या निवडणुका होतील त्यावेळेला वेगळं चित्र बघायला मिळेल. एकच उदाहरण सांगतो, साल १९८० च्या आधी माझ्या हातात सत्ता होती. सत्ता गेली, निवडणुका आल्या



आणि काहीतरी ५०- ५२ आमदार निवडून आले. सहा महिन्यांच्या आत त्यातले फक्त सहाच शिल्लक राहिले, बाकी सगळे पक्ष सोडून गेले. जे सहा शिल्लक राहिले त्यातले एक मला इथे दिसतायत, त्यांचं नाव कमल किशोर कदम! ते थांबले, त्या सहांच्यामध्ये. आमचा पक्ष सहा जणांचा झाला. त्यानंतर जी निवडणूक आली तेव्हा माझ्या सहकारी आमदारांची संख्या ७२ वर गेली पुन्हा गेली. राज्य सरकारमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे फुटीची चिंता करू नका. कोण आले? कोण गेले? त्याच्याबद्दलची चिंता करू नका. आपण एकसंघ राहिलो आणि जनतेच्यावरची बांधिलकी कायम ठेवली तर काही अडचण येत नाही. आपण या ठिकाणी अहमदनगरच्या खासदारांचं भाषण ऐकलं. तुम्ही त्यांच्या घरी गेलंय का कुणी? एका लहानशा घरात म्हणजे अक्षरश: एका खोलीत अशा घरामध्ये राहणारा आणि रात्री दोन-दोन-तीन-तीन वाजेपर्यंत लोकांना भेटणारा, लोकांचं काम करणारा प्रतिनिधी आणि कार्यकर्ता म्हणून त्यांच्याकडे बघितलं जातं. असे अनेक लोक आहेत. माझ्या मते राष्ट्रवादीचा हा ठेवा आहे, हा अतिशय मौल्यवान ठेवा आहे. तुमच्यासारखे कार्यकर्ते एकसंघ राहून विचारांना पुढे नेतील, तर सत्ता- बित्ताची चिंता करू नका. सत्ता आपोआप येईल आणि ती येण्याची स्थिती मला महाराष्ट्रामध्ये दिसतेय. एका बाजूला ही स्थिती आहे. दुसऱ्या बाजूने देशाचं चित्र पहा. आज दोन दृष्टींनी देशाचा विचार करावा लागेल. राष्ट्रीय प्रश्न येतात, तर राष्ट्राच्या हिताच्यामध्ये राष्ट्रवादी कधी राजकारण आणत नाही. ज्याचा उल्लेख सुप्रियाने केला ज्यावेळेला पहलगामला जे घडलं, काही नागरिकांची हत्या केली गेली. त्याच्यामागे कोण आहे? काय आहे? याची चर्चा देशात झाली आणि काही निकाल घ्यावे लागले. त्यावेळेला सरकारवर आम्ही टीका नाही केली. आम्ही सांगितलं की, या देशाच्या भूमीवर नागरिकांवर हल्ले होत असतील तर त्याला सामोरे जाण्याच्यासाठी शासनाने कोणतीही भूमिका घेतली तर त्याचं समर्थन आम्ही करू. इथं राजकारण आणणार नाही, तेच काम आपल्या लोकांनी केलं. आज गांभीर्याने या सगळ्या प्रश्नांचा विचार करायला हवा. सबंध देशाचं चित्र बघितलं, देशाचा नकाशा तुम्ही नजरेसमोर ठेवा. कश्मीरच्या वरच्या भागात चीन आहे. तुम्ही पुढे गेलात तर शेजारी पाकिस्तान आहे. पुढे तुम्ही गेलात तर बांग्लादेश आहे. खाली गेलात तर श्रीलंका आहे. सबंध देशाच्या आजूबाजूचे देश आणि आपण म्हणजे भारत यांच्यामध्ये आज काय स्थिती आहे? एक काळ असा होता, जवाहरलाल नेहरुंचं नेतृत्व आणि भारत हा सगळ्यांना बरोबर घेऊन जाणारा देश म्हणून या देशाचं लौकिक होतं. आज पाकिस्तानशी आमचे संबंध चांगले नाहीत, चीनशी आमचे संबंध चांगले नाहीत. बांग्लादेश ज्याच्या निर्मितीच्यासाठी या देशाने प्रचंड त्याग केला. एका पाकिस्तानचे दोन तुकडे केले, एवढा त्याग केलेला बांग्लादेश आज आमच्या बरोबर नाही. आज जे प्रमुख आहेत ज्यांच्या हातामध्ये बांग्लादेशचे अधिकार आहेत. माझे आणि त्यांचे व्यक्तिगत संबंध होते. ते ज्यावेळेला मंत्रिमंडळात किंवा सत्तेत होते, तर या पुणे शहरात ते माझ्याबरोबर आले होते. आणखीन काही ठिकाणी आले होते. आस्था असलेले देशाच्याबद्दल, शेजाऱ्यांच्या बद्दलचे ते गृहस्थ! पण आज बांग्लादेश भारताने त्यांच्यासाठी इतकं त्याग केल्यानंतर तोही आमचा मित्र राहिला नाही. खाली श्रीलंका तोही आमचा मित्र आहे की नाही? याची शंका यावी. त्या ठिकाणचा चीनचा प्रभाव हा चिंताजनक आहे. म्हणजे हा सबंध देश आणि त्याच्या भोवतीचे सर्व देश आणि आमच्यामध्ये सुसंवाद आहे, असं म्हणण्याची स्थिती नाही. याचा अर्थ हा आहे, देशाचं नेतृत्व करणारं घटक त्यांनी ही सुसंवादाची स्थिती जाणीवपूर्वक निर्माण केली नाही. तर त्याची किंमत देशाला द्यावी लागते. आम्ही या ठिकाणी राजकारण आणणार नाही. पण आमचा आग्रह हा आहे राष्ट्रवादी असेल, काँग्रेस पक्ष असेल इतर डावे पक्ष असतील एकत्र बसून देशाच्या भल्यासाठी काही स्वच्छ भूमिका घेणं, हे सूत्र ठेऊन आम्ही दिल्लीच्या पातळीवर काम करत असतो. त्यामुळे हल्लीचा हा काळ काळजी करण्यासारखा आहे. एकत्र राहण्यासारखा आणि प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्पष्ट निर्णय घेणं, असा हा आजचा काळ आहे. देशातला शेतकरी असेल, कामगार असेल, कष्टकरी तरुण असेल आणि सामाजिक ऐक्य मजबूत करायचं असेल तर विविध घटक, विविध जाती, विविध जमाती, विविध भाषिक या सगळ्यांना एक प्रकारचा विश्वास द्यायचं काम आज आपण केलं पाहिजे. हे जर करू शकलो तर माझी खात्री आहे की, चित्र बदलू शकेल. पण ते बदलायला विचाराने आणि दृष्टी ठेवून काम करणाऱ्या राजकीय पक्षांची, संघटनांची ही आवश्यकता आहे. ती देण्याची ताकद, ती देण्याची दृष्टी ही 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा'च्या कार्यकर्त्यांमध्ये आहे ही अत्यंत जमेची बाब आहे. म्हणून या सगळ्या घटकांच्या हिताच्यासाठी आपण जागरूक राहूया. काहीही झालं तरी चालेल. पण काही घटक यांचं आत्मविश्वास ढळू द्यायचं नाही. समाजातला आदिवासी असेल, शेड्युल कास्ट असेल, महिला वर्ग असेल, युवक वर्ग असेल, ओबीसी असतील या सगळ्यांच्यामध्ये एक प्रकारचा विश्वास आम्ही कामातून, निर्णयातून निर्माण केला पाहिजे. ती सगळी सामुदायिक शक्ती एकत्र घेऊन समाजकारण, राजकारण करणारा पक्ष कोणता? तर तो राष्ट्रवादी आहे, ही स्थिती आपण निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठीच इथून पुढचा कालखंड तुम्ही- मी सगळ्यांनी हातात हात घालून काम करण्याचा आहे. आनंद एका गोष्टीचा आहे पक्ष म्हणजे जी संघटना आणि संघटनेचं काम गेले आठ-दहा वर्ष अत्यंत प्रभावीपणाने जयंतरावांनी केलं. हे तुम्हाला मान्य आहे म्हणून तुम्ही काही वेगळी भूमिका मांडली. जयंतरावांनी माझ्याकडे सांगितलेलं आहे की, ''आता नव्या पिढीला संधी द्या''. तुम्ही- आम्ही सगळे त्यांच्या मागे उभे राहूया. त्यासंबंधीचा विचार करण्याची तयारी आज त्यांची आहे. तुमची मानसिकता वेगळी आहे, हे या ठिकाणी दिसलं. एवढंच सांगू इच्छितो की, प्रमुख सहकाऱ्यांना एकत्रित घेऊन त्यांच्याशी या विषयावरती आम्ही सुसंवाद साधू. सामूहिकपणाने या संदर्भातला निर्णय घेऊ. पण हा निर्णय घेत असताना प्रत्येक तालुक्यामध्ये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये नवीन पिढी, नवीन चेहरे हे दिसले पाहिजेत. आपण उभे करू आणि त्यांना शक्ती देऊ. माझी खात्री आहे कर्तुत्व असलेले हजारो कार्यकर्ते, तरुण कार्यकर्ते आज आपल्या पक्षामध्ये आहेत. त्यांना संधी देऊया, प्रतिष्ठा देऊया, मार्गदर्शन करूया आणि त्याच्यातून राज्य चालवण्याची कुवत असलेलं नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देऊ शकतो, असा प्रकारचा इतिहास हा निर्माण करायचा आहे. त्याच्यासाठी तुम्हा सर्वांची तयारी असली पाहिजे. दोन- तीन महिन्यांत या निवडणुका येतील, त्या निवडणुकीमध्ये जिल्ह्या- जिल्ह्यांमध्ये जिल्ह्यातलं जे नेतृत्व आहे त्या सगळ्यांना विश्वासात घेऊन या निवडणुका कशा लढवायच्या? एकट्याने लढवायच्या? काही लोकांना बरोबर घेऊन लढवायच्या? याचा विचार त्या जिल्ह्यातल्या नेतृत्वाला विश्वासात घेऊन करण्याची वेळ आज आलेली आहे. हे जर आपण करू शकलो तर माझी खात्री आहे, आणखी एक मोठी नव्या पिढीची, नव्या नेतृत्वाची फळी ही महाराष्ट्रामध्ये जिल्ह्या- जिल्ह्यांत दिसेल. ते काम आपल्याला करायचं आहे. हा आजचा कार्यक्रमाचा सोहळा संपल्यानंतर पुढचे तीन महिने सगळं लक्ष तुमचं तुमच्या भागामध्ये ज्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत तिथं नवीन नेतृत्व कसं आणायचं? ५० टक्के भगिनींच्या जागेमध्ये कर्तुत्ववान आणि आत्मविश्वासाने उभ्या राहिलेल्या मुली कशा पुढे आणायच्या? या सगळ्या गोष्टींचा विचार तुम्ही करा. माझी खात्री आहे की, जी नेतृत्व करणारी राज्याची या ठिकाणी जी फळी आहे ती याच्यामध्ये तुम्हा सगळ्यांच्या पाठीशी राहील. आपण येत्या तीन महिन्यांच्या निवडणुकीच्यानंतर सबंध महाराष्ट्रासमोर नवी नेतृत्व आणू आणि त्यांच्या कर्तृत्वातून इतिहास घडवू, एवढाच विश्वास बाळगतो.

# गतिरोधकासाठी जिल्हा प्रशासनाला आत्मदहनाचा इशारा

## जिल्हाधिकारी, तहसीलदार साहेब आत्मदहनाची वेळ येऊ देऊ नका-हरिओम क्षीरसागर

लिंबागणेश-प्रतिनिधी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ डी मांजरसुंबा ते पाटोदा मार्गावरील लिंबागणेश बसस्थानक तसेच रस्त्यालगत असणारे भालचंद्र विद्यालय लिंबागणेश, आदि अपघातप्रवण क्षेत्रात गतिरोधक बसवावेत ही मागणी वारंवार केली असुन प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले.२७ डिसेंबर २०२३ रोजी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर (मुख्य प्रचार प्रमुख बीड, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य) यांचे आपल्या कार्यालयास निवेदन.२९ डिसेंबर २०२३ रोजीचे हरिओम क्षीरसागर (जिल्हाध्यक्ष युवा ग्रामीण पत्रकार संघ बीड तथा सहप्रचार संयोजक बीड माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य.) यांचे निवेदन. २३ डिसेंबर २०२४ रोजीचे हरिओम क्षीरसागर (जिल्हाध्यक्ष युवा ग्रामीण पत्रकार संघ बीड तथा सहप्रचार संयोजक बीड माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य.) यांचे निवेदन.३१ जानेवारी २०२५ रोजी म.रा.र.वि.महामंडळ छ.संभाजीनगर कार्यकारी अभियंता मा.श्री. अशोकजी ससाणे यांना पोस्टाद्वारे पाठवण्यात आलेले निवेदन. ३ फेब्रुवारी २०२५ रोजीचे हरिओम क्षीरसागर (जिल्हाध्यक्ष युवा ग्रामीण पत्रकार संघ बीड) यांचे निवेदन. अहमदपुर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी वर पाटोदा ते मांजरसुंबा या मार्गावर लिंबागणेश गाव असून हे गाव पुरातन तीर्थक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थान असल्याने संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. त्यासोबत तालुक्याकीतील जिल्हा परिषद सर्कल चे गाव असून मोठी बाजारपेठ देखील आहे. या महामार्गाला लागूनच भालचंद्र विद्यालय असून मोठ्याप्रमाणात शाळेतील विध्यार्थी यांची यारस्त्यावरून वर्दळ असते. वारंवार प्रशासन दरबारी पाठपुरावा तसेच वेगवेगळी आंदोलने करून देखील येथे गतिरोधक बसविण्यात आली नाहीत, गतिरोधक बसवण्यासाठी उपोषणाचा मार्ग....! विद्यार्थ्यांच्या जीवासाठी गतिरोधक बसवण्यासाठी अडचण काय? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला होता. तसेच ४ जानेवारी २०२४ रोजी तत्कालीन तहसिलदार मा. सुहास हजारे यांच्या मध्यस्तीनंतर लिंबागणेशकरांनी रस्ता रोको स्थगित केले मात्र एक वर्ष उलटून गेले तसेच दि.३ जानेवारी रोजी भालचंद्र विद्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते. उपोषणस्थळी म.रा.र.वि. महामंडळ छ.संभाजीनगर कार्यकारी अभियंता श्री. अशोक ससाणे तसेच मा. तहसीलदार चंद्रकातजी शेळके यांच्या आश्वासनानुसार उपोषण स्थगित करण्यात आले होते. त्यांनतर दि.३१ जानेवारी २०२५ रोजी म.रा.र.वि.महामंडळ छ. संभाजीनगर कार्यकारी अभियंता मा. श्री. अशोकजी ससाणे यांना पोस्टाद्वारे पाठवण्यात आलेले निवेदन. तसेच दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, ग्रह विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड, तहसीलदार, तहसील कार्यालय बीड तसेच पोलीस अधीक्षक यांना देखील युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने लेखी निवेदन दिले होते, मात्र ४ महिणे उलटून गेले तरी अद्याप



शाळेसमोर गतिरोधक अथवा रम्बल स्ट्रीप बसवण्यात आले नाहीत. तरी अद्याप कंत्राटदराने व प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येते, त्यामुळे सोमवार दि.१६ जून २०२५ रोजी लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यलयासमोर आत्मदहन करण्यात येणार आहे असा इशारा युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिला आहे. अपघात प्रवण क्षेत्र व रहदारीच्या ठिकाणी तसेच लिंबागणेश स्थित भालचंद्र माध्यमिक विद्यालयासमोर गतिरोधक बसविण्यात यावेत. अहमदपूर-अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा मार्गावरील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक विद्यालयात १५०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असुन आणि शाळेच्या अगदी मुख्य प्रवेशद्वार राष्ट्रीय महामार्गाला लागूनच असल्याने वर्दळ असते. हे ठिकाण अपघात प्रवण क्षेत्र बनले असून याठिकाणी वाहनांची गति कमी ठेवण्यासाठी गतिरोधक असणे आवश्यक आहे मात्र वारंवार निवेदने तसेच ३ आंदोलनानंतर सुद्धा संबंधित ठेकेदार व आधिकारी दुर्लक्ष करत आहेत. तसेच दि. ३ जानेवारी रोजी भालचंद्र विद्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते. उपोषणस्थळी म.रा.र.वि. महामंडळ छ. संभाजीनगर कार्यकारी अभियंता श्री. अशोक ससाणे तसेच मा. तहसीलदार चंद्रकात शेळके यांच्या आश्वासनानुसार उपोषण स्थगित करण्यात आले होते. त्यामुळे तात्काळ गतिरोधक बसविण्यात यावेत. रस्त्याच्या मधोमध असणारया लोखंडी दुभाजकांची उंची कमी करण्यात यावी. या ठिकाणी बसविण्यात आलेल्या लोखंडी दुभाजकांची उंची जास्त असल्याने रस्ता ओलांडताना पलिकडले दिसत नसल्याने सुद्धा बरेच अपघात झालेले आहेत, त्यामुळे जिथे रस्ता क्रॉसिंग करायचा आहे. तेथील लोखंडी दुभाजकांची उंची काही ठराविक अंतरापर्यंत कमी करण्यात यावी. अशा मागण्या आहेत. जिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी मनावर घेतले तर लिंबागणेश येथे गतिरोधक होऊ शकतात, मात्र त्यांना बसवायचे नसतील तर भविष्यात विद्यार्थ्यासोबत, अथवा प्रवाशासोबत काही दुर्दैवी घटना घडल्यास, त्यांनी जबाबदारी घेऊ असे लेखी आश्वासन द्यावे-हरिओम क्षीरसागर (जिल्हाध्यक्ष युवा ग्रामीण पत्रकार संघ बीड)

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ११ जून २०२५
https://lokaarambh.com


## वादळी वाऱ्यामुळे झाड कोसळले.....!



किरण जैन. मानोरा : सोमवार दि. ९ मे, मानोरा परिसरात सायंकाळच्या सुमारास आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे आणि पावसामुळे, गव्हा ते आसोला मार्गावर बाभळीचे झाड बरसत्यात कोसळले, तसेच त्या परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता.

## विद्युतगतिकीचे जनक – आंद्रे-मरी अँपियर यांचा स्मृतिदिन दिनांक – 10 जून 1836



पॅरिस (फ्रान्स) : विद्युतचुंबकीयत्वाचा पाया रचणारे आणि विद्युत प्रवाहाच्या एककाला नाव देणारे थोर फ्रेंच शास्त्रज्ञ आंद्रे-मरी अँपियर यांचा स्मृतिदिन आज (१० जून) सर्वत्र विज्ञानप्रेमी सन्मानाने साजरा करतात. आंद्रे-मरी अँपियर हे फ्रान्सचे ख्यातनाम भौतिकशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ होते. त्यांनी विद्युत आणि चुंबकीय घटकांमधील संबंधाचा अभ्यास करून विद्युतचुंबकीयत्वाचा शोध लावला, जो आधुनिक विज्ञानात मोलाचा ठरला. त्यांच्या या महान योगदानामुळे विद्युत प्रवाह मोजण्याच्या आंतरराष्ट्रीय एककाला (SI Unit) 'ॲम्पिअर' (Ampere) असे नाव देण्यात आले. 'ॲम्पिअर' हे विद्युत प्रवाहाचे प्रमाण मोजण्याचे एकक असून, त्याचे SI चिन्ह 'A' आहे. एका ॲम्पिअरचा अर्थ प्रति सेकंद 1 कूलोंब विद्युतभार वाहून नेणारा प्रवाह असा होतो. यामुळेच अँपियर यांना "विद्युतगतिकीचे जनक" म्हणून ओळखले जाते. त्यांचा जन्म १७७५ मध्ये झाला आणि त्यांनी १८३६ मध्ये या जगाचा निरोप घेतला. परंतु त्यांच्या कार्याची उजळणी विज्ञानाच्या प्रत्येक पायरीवर आजही अनुभवता येते. आज विज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अँपियर यांचे कार्य हे प्रेरणादायी ठरावे, हीच खरी त्यांच्या स्मृतिदिनी आदरांजली!







2 जून ते 12 जून पर्यंत वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण प्राथमिक स्तर हा अध्यापक विद्यालय बीड येते चलो आहेत.तेथे सुलभक म्हणून श्रीमती मिर्झा कौसर मेडम , श्रीमती शैलजा आव्हाड मेडम,नवले सर,सपकाळ मेडम,आणि तसेच मोहम्मद इशक सर आहेत. हा प्रशिक्षण मध्ये जे घटक आहेत . त्याच्या माहिती सर्व प्रशिक्षणार्थी पर्यंत योग्य पद्धती ने पोहचविण्यात येते.तसेच प्रशिक्षणार्ती पण आनंदाने यत्त सहभागी होत आहेत.

# उमापूर ग्राम पंचायतची नवीन घंटागाडी बनली शोभेची वस्तू

## सर्वत्र अस्वच्छता असताना नवीन गाडी दिड महिन्यापासून धुळखात

उमापूर / प्रतिनिधीमोठा गाजावाजा करून गेवराई तालुक्यातील उमापूर ग्रामपंचायतने कचरा घंटागाडी खरेदी केली. ज्याद्वारे गावातील कचरा गोळा करायचे काम होते. मात्र घंटा गाडी खरेदी करून कुठेच कचरा जमा करायला दिसत नाही. सध्या घंटागाडी ही धूळ खात पडली असून ती खराब होण्यासाठी की शोपीस म्हणून ठेवली आहे ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.ग्रामपंचायत प्रशासन गावात कोणत्याही प्रकारची स्वच्छता करताना दिसून येत नाही. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी सुटली आहे. यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच घाणीचे साम्राज्य वाढल्यामुळे डासांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. तसेच कचरा गाडी खरेदी करूनही ग्राम पंचायत कचरा जमा करण्यास फिरत नाही . त्यामुळे ठिकठिकाणी गावात अस्वच्छता निर्माण होत असून विविध रोगराई तसेच आजारांना







### मंदीर मस्जिद समोरच अस्वच्छता...

हणुमान मंदीर, कमलेश्वर मंदीर, गणपती मंदीर, नुराणी मस्जिद, मरकज मस्जिद या देवस्थांनांसमोरच कचऱ्याचे ढीगार साचलेले दिसतात तर सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन नसल्याने प्रवेश करताना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे, तसेच पावसाचे पाणी साचुन या भागातील नागरीकांना डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने आजारी पडत आहेत यामुळे ग्राम पंचायतने तात्काळ सांडपाणी व पावसाच्या पाण्याचे योग्य वीह्लेवाट लावावी अशी मागणी होत आहे.

आमंत्रण दिले जात आहे. स्थानिक उमापूर ग्रामपंचायतीने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. भविष्यात याचे दुष्परिणाम होऊ शकतात. घंटा गाडी ही धूळ खात पडली असून ही गाडी सध्या गावाच्या कडेला फक्त एक स्वच्छता अभियानाचे जाहिरात करण्यासाठी शोपीस म्हणून ठेवलेली आहे, असे चित्र सध्या दिसून येत आहे. गावाच्या स्वच्छतेकडे लक्ष देण्याची मागणी होतेय गावामध्ये ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग पडलेले दिसून येतात. नाल्या, गटारांची सफाई होत नाही. नाल्यांच्या काठावरील गवत साफ होत नसल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. अशा प्रकारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. घाणीच्या साम्राज्याला दूर करण्याकरिता प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांनी आधुनिक कृषी वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर करावा

## खरीप- पूर्व विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत शेतकरी शास्त्रज्ञ संवाद

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड :- कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी तर्फे विकसित कृषी संकल्प अभियानाची दिनांक 29 मे पासून उत्साहात सुरुवात झाली. या अभियानाचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक संशोधन यांची माहिती देणे आहे.अभियानाचा व्यापक विस्तार :- या अभियानाद्वारे शेतीतील सुधारित तंत्रज्ञान, उत्पादन खर्च कमी करण्याचे उपाय, सेंद्रिय शेती आणि पिकांची विविधता वाढवणे यावर भर दिला जात आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) च्या मार्गदर्शनाखाली हे अभियान ७२३ जिल्ह्यांमध्ये राबवले जात असून ७३१ कृषी विज्ञान केंद्रे आणि ११३ संशोधन संस्थांचे शास्त्रज्ञ यात सक्रिय सहभाग घेत आहेत. विशेष कार्यक्रम :- कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी तर्फे आयोजित मुदखेड तालुक्यातील ईजळी, चिकाळा, आमदुरा, राजवाडी, डोंगरगाव, बारड, रोही पिंपळगाव, डोणगाव, वसंतवाडी, पाथरड (हिस्सा), पाथर्डी (रेल्वे)आणि



खंबाळा या गावांतील कार्यक्रमात शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन करण्यात आले. प्रगत तंत्रज्ञान, माती परीक्षण आणि मृदा आरोग्य व्यवस्थापन, जैविक निविष्ठा,केळी लागवड व व्यवस्थापन,शेतीविषयक आणि अन्न प्रक्रिया विषयक विविध राज्य व केंद्र शासकीय योजना,पशुसंवर्धन, अन्न प्रक्रिया उद्योग , सेंद्रिय परसबाग आणि बियाण्यांची उगवणक्षमता चाचणी,बियाणांच्या वाणाची निवड यासंदर्भात तज्ज्ञांनी माहिती दिली. तज्ज्ञांचे मार्गदर्शन :- या कार्यक्रमात राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण केंद्र नागपूर चे वैज्ञानिक डॉ. गोपाल तिवारी, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.देवीकांत देशमुख , गृह विज्ञान तज्ञ सौ. ए.एस.पवळे , तसेच मुदखेड तालुक्याचे मंडळ कृषी अधिकारी श्री. अविनाश टोंपे , आत्मा चे श्री.आनंद बोईनवाड तालुका कृषी अधिकारी श्री. दिलीप जाधव, उप विभागीय कृषी अधिकारी श्री. राजकुमार रणवीर आणि श्री.गजानन करपे सहाय्यक कृषी अधिकारी यांनी मार्गदर्शन केले., श्री शंकर कोणापुरे, श्री. बी.एन.वाघमारे, श्री. अशोक भालेराव,गावातील प्रतिष्ठित नागरिक देखील त्यावेळी उपस्थित होते. शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी:- या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळणार असून, उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना, सेंद्रिय शेतीचे फायदे आणि विविध सरकारी योजनांचा लाभ घेता येईल. पुढील कार्यक्रमाची रूपरेषा :- पुढील कार्यक्रमासाठी भोकर तालुक्यातील हळदा, मोघाळी, हाडोळी, खरबी, चितगिरी ,ताटकळवाडी, बटाळा, नागापूर, रेणापूर, सोनारी,वाकड, धावरी आणि थेरबन या गावांमध्ये करण्याचे योजिले आहे. तरीही जास्तीत जास्त शेतकरी बांधव महिला भगिनींनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड -१ च्या वतीने करण्यात येत आहे.

# संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष पदासाठी आज मुलाखती

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : संभाजी ब्रिगेड पुर्नगठण मोहिमे अंतर्गत नांदेड येथे जिल्हाध्यक्ष, महानगराध्यक्ष पदासाठी दि.११-जुन रोजी मुलाखती घेण्यासाठी निरीक्षक येणार आहेत. संभाजी ब्रिगेड ने वेळोवेळी शेतकऱ्यांच्या, युवकांच्या, महिलांच्या विधायक प्रश्नासह मराठा आरक्षण विषयावर प्रबोधनातुन तसेच आंदोलन करून सरकार दरबारी रेटा लावण्याचे काम केले आहे.अशा संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष व ईतर पदे दर दोन तीन वर्षाला बदलुन नवीन युवकांना संधी दिली जाते जुन्यांना विभागीय व प्रदेश पदाधिकारी पदावर घेतल्या जाते त्याच पद्धतीने प्रदेशाध्यक्ष ॲड मनोज आखरे महासचिव सौरभ खेडेकर यांच्या सुचनेनुसार महाराष्ट्र भर होत असलेल्या ९ जुन ते १५ जुन दरम्यान होत असलेल्या संभाजी ब्रिगेड च्या पुर्नगठण मोहिमे अंतर्गत आज दिनांक ११ जुन २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह नांदेड येथे सकाळी १०-३० वाजता जिल्हाध्यक्ष, महानगराध्यक्ष निवडीसंदर्भात इच्छुकांच्या मुलाखती घेण्यासाठी संभाजी ब्रिगेड चे प्रदेश संघटक उमाकांत उफाडे, संभाजी ब्रिगेड चे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील हे निरीक्षक म्हणुन उपस्थित राहणार आहेत.तरी नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी,महानगर पदाधिकारी,कार्यकर्ते यांनी या बैठकीस उपस्थित रहावे नांदेड दक्षिण, नांदेड उत्तर, नांदेड मध्य जिल्हाध्यक्ष, महानगराध्यक्ष, विभागीय पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी पदासाठी इच्छुक उमेदवारांनी विहीत स्वरुपात अर्ज व अहवाल सोबत आणावा असे आवाहन संभाजी ब्रिगेड च्या करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्षाची जबाबदारी सतीश शिंदेंच्या खांद्यावर!

# पै.सतीश शिंदेंच्या रुपान राष्ट्रवादीला मिळाला खामक्या जिल्हाध्यक्ष!

बीड | प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीच्या बीड युवक जिल्हा अध्यक्षपदी पैलवान सतीश आबा शिंदे यांची निवड करून पक्षाला बळकटी देणारा नेतृत्व दिलं आहे. तरुणाईच्या गळ्यातील ताईन म्हणून ज्यांची ओळख असंच नेतृत्व बीड जिल्ह्याला मिळाल्याने पक्षाची मरगळ झटकली जाईल असा विश्वास व्यक्त होत आहे. पैलवान सतीश आबा शिंदे यांच्या निवडीने बीड जिल्ह्यातील तरुणाईत उत्साहाचे वातावरण निर्माण झाला आहे. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये आपली वेगळी छवी निर्माण करणारे पैलवान सतीश आबा शिंदे यांच्या खांद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पार्टीकडून युवक बीड जिह्ला अध्यक्षपदाची जबाबदारी दिल्याने बीड जिल्ह्यातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षाला जिह्लाध्यक्ष बरोबर युवक जिह्लाध्यक्ष देखील खामक्या मिळाला असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. सतीश शिंदे यांच्या रूपान पक्षातील राहिलेली मरगळ सुद्धा झटकली जाईल आणि पक्षातील कार्यकर्त्यांना नवीन ऊर्जा मिळू शकते. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये सुद्धा सतीश आबा शिंदे यांचा मोठा फायदा होऊ शकतो असा विश्वास देखील व्यक्त होऊ लागला आहे.





### युवकांच्या हक्काचे नेतृत्व जिल्हा अध्यक्षपदावर विराजमान

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये आपल्या कर्तुत्वाने आपली वेगळी ओळख निर्माण करणारे सतीश आबा शिंदे हे बीड जिल्ह्यातील प्रत्येक युवकाच्या मनामध्ये राज्य करून बसले होते आता हेच नेतृत्व राष्ट्रवादी पक्षाने ओळखले आणि त्यांच्यावर युवक बीड जिह्ला अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. खऱ्या अर्थानं बीड जिल्ह्यातील युवकांच्या मनातील नेतृत्वाला न्याय मिळाला आणि आपल्या हक्काचे नेतृत्व आपल्याला मिळालं अशा भावना व्यक्त होत आहेत.

### पक्षाचे व नेतृत्वाचे आभार – पै.सतीश शिदे

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाने व पक्षाचे नेतृत्व देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष जयंतरावजी पाटील, युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी विचारपूर्वक माझ्यावर टाकलेली युवक जिह्लाध्यक्षपदाची जबाबदारी खंबीरपणे सांभाळेल आणि पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न करेल असा विश्वास देतो आणि सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो...

**पै.सतीश आबा शिंदे नवनिर्वाचित युवक जिल्हाध्यक्ष बीड.**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ११ जून २०२५
https://lokaarambh.com



# पाकिस्तानमध्ये घुसून हल्ला करणार
# भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांचा पाकला अल्टीमेटम

भारत आणि पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी झाली आहे. परंतु दोन्ही देशांतील तणावाचे कारण संपलेले नाही. यामुळे भारताने ऑपरेशन सिंदूर संपलेले नाही तर स्थगित केल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे. आता जर पाकिस्तानने पुन्हा भारताला चिथावणी दिली तर भारत पाकिस्तानच्या आत कुठेही हल्ला करण्यास तयार आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी ब्रुसेल्सच्या भेटीदरम्यान पॉलिटिकोशी बोलताना हे वक्तव्य केले. भारतीय परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटले की, पाकिस्तान हा एक असा देश आहे, जो दहशतवादाचा वापर देशाचे धोरण म्हणून करतो. हाच कळीचा मुद्दा आहे. पॉलिटिकोशी बोलताना डॉक्टर जयशंकर म्हणाले, ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताचे लढाऊ विमाने आणि क्षेपणास्त्रांनी पाकिस्तानचे मोठे नुकसान केले. त्यामुळे पाकिस्तान गुडघे टेकत शस्त्रसंधीसाठी तयार झाला. राफेल असो की इतर क्षेपणास्त्रे हे किती प्रभावित होते, त्याचा पुरावा पाकिस्तानचे नष्ट झालेली हवाईतळ आहेत. १० मे रोजी नेमके काय घडले,



ते सांगताना एस.जयशंकर यांनी सांगितले की, भारत आणि पाकिस्तानमधील हल्ले १० मे रोजी एकाच कारणामुळे थांबले. त्या दिवशी सकाळी आम्ही आठ पाकिस्तानी हवाई तळांवर हल्ले केले. त्या हवाई तळांचे प्रचंड नुकसान केले. माझ्या शब्दांवर विश्वास ठेऊ नका, परंतु उपग्रहद्वारे गूगलवर उपलब्ध असलेल्या फोटोंवर विश्वास ठेवा. ज्या धावपट्टीवर आणि रन वे वर हल्ले झाले, त्याचे फोटो तुम्ही पाहू शकतात. एस.जयशंकर यांनी पाकिस्तानला कठोर शब्दांत ईशारा दिला. ते म्हणाले, पाकिस्तान उघडपणे दहशतवाद्यांना प्रशिक्षण देत आहे. त्यानंतर त्या दहशतवाद्यांना भारतात पाठवत आहे. आता हे आम्ही सहन करणार नाही. आमचा पाकिस्तानला स्पष्ट संदेश आहे. पाकिस्तानने दहशतवादी संघटना आणि दशतवाद्यांना मदत करण्याचे सुरुच ठेवले तर पाकिस्तानच्या कोणत्या भागात ते दहशतवादी आहेत, त्याचा विचार आम्ही करणार नाही. ते जेथे असतील त्या ठिकाणी जाऊन आम्ही कारवाई करणार आहोत.

२२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात दहशतवाद्यांनी २६

## स्व.आर.टी.जिजा संयम आणि निष्ठेचे प्रतिक होते पंकजाताई मुंडे यांनी दिला आर.टी. देशमुख यांच्या आठवणींना उजाळा

परळी वै. – माजी आमदार आर. टी. देशमुख यांच्या गोडजेवण कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपस्थित राहून आपल्या भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमात त्यांनी देशमुख यांच्या स्मृतींना उजाळा देताना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. ना. पंकजाताई मु ंडे म्हणाल्या, संयम, निष्ठा, प्रेम आणि जिव्हाळा म्हणजेच आर. टी. देशमुख जिजा होते. त्यांच्या अचानक निधनाने मला मोठा धक्का बसला. ते केवळ राजकीय सहकारी नव्हते, तर माझ्यासाठी एक भावनिक आधार होते. मी अनेक वेळा अडचणीत असताना त्यांनी मार्गदर्शन केलं. त्यांच्या चेहऱ्यावर कधीही चिंता दिसली नाही. अत्यंत शांत, संयमी आणि आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही, ही खूप मोठी पोकळी आहे. यानिमित्त हभप यशवंत महाराज पाटील यांचे कीर्तन झाले. त्यांनी



ङ्गकर्तव्यनिष्ठ जीवनाची प्रेरणाफ या विषयावर भावस्पर्शी कीर्तन सादर केलं. कीर्तन श्रवण करताना पंकजाताईंच्या डोळ्यांत अश्रू तरळले. कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, ग्रामस्थ व देशमुख यांचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होत

## गढूळ पाणी आणि आंब्यांमुळे पोटदुखीचे रुग्ण वाढले!

बीड : मे महिन्यात झालेल्या सर्वदूर पावसामुळे तलावातील पाण्याची पातळी वाढली तसेच पाणी गढूळ झाले. बीड नगर परिषदेकडून नळांना गढूळ पाण्याचा पुरवठा करण्यात येऊ लागला आहे. तसेच पाऊस पडल्यानंतर वेगवेगळ्या जातीचे कलमी आंबे खाल्ल्यामुळे ही अनेकांना पोटदुखीचा त्रास होऊ लागला आहे. म्हणून जिल्हा रुग्णालयासह अनेक सरकारी रुग्णालय तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये पोटदुखीचे रुग्ण वाढले आहे. ही बाब लक्षात घेता नागरिकांनी सावधानता आणि दक्षता बाळगावी. असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसू फ़ यांनी केले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहराला बीड नगर परिषदेकडून करण्यात येणारा पाण्याचा पुरवठा आठ ते पंधरा दिवसात करण्यात येत आहे, तोही गढूळ आहे. नळांना येणारे पाणी अक्षरशः माती कालविल्यासारखे येत आहे. तेच पाणी पिण्यासाठी वापरले जात असल्याने अनेकांना पोटदुखीचा त्रास होऊ लागला आहे. या त्रासापासून वाचण्यासाठी नागरिकांनी पिण्याच्या पाण्यात त्रुटी फिरवावी. गाळ खाली गेल्यावर ते पाणी पिण्यासाठी वापरावे किंवा पिण्याचे पाणी गरम करून थंड करावे आणि नंतरच पिण्यासाठी वापरावे तसेच यावेळी पाऊस मे महिन्यातच पडला.



## आष्टीच्या तलावात चाळीसगावचा तरुण बुडाला

कडा : आष्टी तालुक्यातील मायंबा सावरगाव येथे देवदर्शनासाठी आलेला तरूण मित्रांसह तलावात पोहण्यासाठी गेला होता. मात्र, अचानक दम लागल्याने तरुण तलावात बुडाल्याची घटना सोमवारी (दि. ९) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली. ओंकार गोकुळ गडरी (२२, रा. मेहुनबार ता. चाळीसगाव, जि. जळगाव) असे तरुणाचे नाव आहे. चाळीसगाव तालुक्यातील मेहुनबार येथील ओंकार गडरी हा तरूण मित्रांसह सोमवारी सकाळी आष्टी तालुक्यातील मच्छिंद्रनाथ देवस्थ–ान येथे देवदर्शनासाठी आला होता. या परिसरातील तलाव पाहून दुपारी एक वाजता ओंकार इतर मित्रांसोबत पोहण्यासाठी उतरला. पोहताना अचानक ओंकार पाण्यात गंटागळ्या खाऊ लागला. दम लागत असल्याने तो पाण्यात बुडू लागल्याचे लक्षात येताच मित्रांनी मदतीसाठी आरडा ओरडा केला.

## वर्षभरापूर्वीच पुलाचं काम झाल्याचं दाखवत बिल उचचलं!

आष्टी : आष्टी मतदारसंघात केवळ कागदोपत्री पूल दाखवून दहा लाखांचा निधी लाटण्याचा प्रकार समोर आला होता. आष्टी तालुक्यातील तवलवाडी ते देवीगव्हाण या गावांना जोडणाऱ्या नदीवर दहा लाखांचा पूल मंजूर करण्यात आला. परंतु वर्षभरापूर्वीच या पुलाचे काम पूर्ण झाल्याचे दाखवून बिल देखील उचलण्यात आले. या पुलाची निर्मिती व्हावी अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात होती. तसेच राहुल जगताप या तरुणांने देखील बेमुदत उपोषण सुरू केले. दरम्यान या सर्वाची दखल घेत प्रशासन कामाला लागले आहे. केवळ कागदोपत्री पूल दाखवून निधी लाटल्याचा धक्कादायक प्रकार घडला होता. आष्टी ग्रामस्थांच्या संघर्षानंतर आणि माध्यमांच्या पाठपुराव्यामुळे अखेर या पुलाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. ही घटना आष्टी तालुक्यातील तवलवाडी ते देवीगव्हाण या दोन गावांना जोडणाऱ्या नदीची. या ठिकाणी सुमारे दहा लाखांचा पूल मंजूर झाला होता. मात्र वर्षभरापूर्वीच या पुलाचे काम पूर्ण झाल्याचे दाखवत अधिकाऱ्यांनी बिल उचलले होते. प्रत्यक्षात त्या ठिकाणी कुठलाही पूल नव्हता, त्यामुळे गावकऱ्यांना पावसाळ्यात नदी पार करणे अवघड व्हायचे. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती. ही बाब समोर आल्यानंतर तवलवाडीतील युवक राहुल जगताप याने थेट बेमुदत उपोषण सुरू



केले होते. बेमुदत उपोषण सुरू केल्यानंतर केल्यानंतर जिल्हा प्रशासनालाही दखल घ्यावी लागली. त्यानंतर अखेर प्रशासनाने हालचाल सुरू करत पुलाच्या बांधकामाला प्रत्यक्षात सुरुवात केली आहे. सध्या त्या ठिकाणी मातीचा भर टाकण्याचं काम सुरू आहे. गावकऱ्यांनी आणि उपोषणकर्त्यांनी प्रशासनाच्या या पावलंवर समाधान व्यक्त केलं आहे, मात्र काम पूर्ण होईपर्यंत लक्ष ठेवणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आह

# वडिलांच्या आठवणीत वृक्षारोपण ; संतोष पवार यांचा सामाजिक संदेश!
# अस्थीचे खड्ड्यात विसर्जन करून वृक्षारोपण!

कुसळंब | प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील संतोष पवार यांच्या वडीलाचे नुकतच काही दिवसापूर्वी निधन झालं. निधनानंतर अस्थी व राख विसर्जन करण्यासाठी प्रत्येक जण पाण्यामध्ये घेऊन जातात परंतु काही वर्षापूर्वी पत्रकार सचिन पवार यांनी त्यांच्या आईच्या निधनानंतरची राख व अस्थी शेतात विसर्जन करून झाडे लावण्याचा सामाजिक संदेश दिला होता. कुसळंब सह परिसरामध्ये त्यांचं अनुकरण केलं जात असून अस्थि व राख शेतात विसर्जन करून तिथे झाडे लावण्याची परंपरा सुरू आहे. संतोष पवार यांच्या वडीलाचे निधन काही दिवसापूर्वी झालं होतं. निदान नंतर असती व राख शेतामध्ये खड्डे खांदून तिथे त्यांच्या स्मरणार्थ झाडे लावण्याचा त्यांनीही संकल्प हाती घेतला. या संकल्पचा सर्व क्षेत्रातून कौतुक केलं जात आहे. आता माझी संदेश कुसळंबकरांनी सुरू केला असून भविष्यकाळात महाराष्ट्रामध्ये हा संदेश जावा यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावे असे आवाहनही करण्यात येत आहे. वडिलांच्या आठवणीत लावलेल्या झाडाचं संगोपन करण्याची जबाबदारी सुद्धा आपलीच असल्याने झाडे मोठे होतील आणि निसर्गाचा ही समतोल राखला जाईल या हेतून हा संकल्प सुरू झाला आहे.



### परंपरा आणि विज्ञानाचा समन्वय साधनार कौतुकास्पद कार्य : अतुल शेलार

कुसळंब येथील संतोष जी पवार यांनी आपल्या वडीलाच्या दशक्रिया विधीला राख व अस्थी पाण्यात न सोडता शेतामध्ये खड्डे खोदून त्या ठिकाणी वृक्षरोपण करून एक प्रेरणादायी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून पर्यावरण संरक्षणा सोबतच समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. अशाप्रकारे परंपरा आणि विज्ञानाचा समन्वय साधणारे त्यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. इकडे फोटोमध्ये दिसणारी एकत्रित वृक्षरोपणाची कृती हा त्यांच्या या विचाराचा सुंदर अविष्कार आहे.

अतुल शेलार सामाजिक कार्यकर्ते कुसळंब.

### कुटुंब अन निसर्गाचा समतोल महत्त्वाचा : संतोष पवार

सामाजिक क्षेत्रात काम करताना निसर्ग आणि कुटुंबाचा समतोल महत्त्वाचा असतो. वेगवेगळ्या माध्यमातून संदेश देता येऊ शकतो परंतु काही संदेश योग्य वेळी देता येतात निसर्गाचा संदेश बोलून सांगून रुजत नाही तो कृतीतून रुजवावा लागतो. पत्रकार सचिन पवार यांनी दिलेला सामाजिक संदेश आज सर्वदूर पसरला आहे. निधनानंतर अस्थि व राख ही पाण्यात न विसर्जन करता शेतामध्ये विसर्जन करून वृक्षरोपण करा हा महत्त्वाचा संदेश त्यांनी त्यांच्या आईच्या निधनानंतर दिला त्याचा अनुकरण कुसळंब सह परिसरातही मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे. यामुळे कुटुंब आणि निसर्गाचा समतोल राखला जाऊ लागला आहे.. सर्वांनीच हा निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करावा असे आव्हान संतोष पवार यांनी केले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com